# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कौशल्य विकास व न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत "वार्डबॉय प्रशिक्षण, हॉटेल मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट प्रशिक्षण, रिटेल मार्केटींग, इलेक्ट्रीकल यांच्या फिटिंगबाबत

**(१) ३६१२४ (१२-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौशल्य विकास व न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत देण्यात आलेल्या "वार्डबॉय प्रशिक्षण, हॉटेल मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट प्रशिक्षण, रिटेल मार्केटींग, इलेक्ट्रीकल फिटींग" इत्यादी योजना राबविताना बनावट प्रशिक्षणार्थी यादी, बनावट प्रशिक्षण स्थळ इ.अशा प्रकारे अस्तित्वात नसलेल्या संस्था दाखवून वित्तीय अनियमितता केल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारणी/पांढरकवडा/किनवट/कळमनुरी/अकोला/औरंगाबाद/पुसद प्रकल्पांमध्ये उक्त प्रकारे बोगस संस्था व बोगस प्रशिक्षणार्थी यादी यांचे बोगस दस्ताऐवज तयार करुन आदिवासी विकास विभागाची पर्यायाने शासनाची सुमारे रु.१,९५,८२,१३३/- रक्कमेची फसवणूक करण्यात आल्याबाबतचा "अपर आयुक्त, अमरावती" यांचे स्तरावरील चौकशी समितीचा अंतरिम अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०६-२०२४) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणी दोषींविरुद्ध प्रकल्प कार्यालय, धारणी यांनी दिनांक ०४.०५.२०२१ रोजी प्रकल्प कार्यालय, किनवट यांनी दिनांक १३.५.२०२१ रोजी व औरंगाबाद प्रकल्प कार्यालयाने दिनांक १२.०४.२०२१ रोजी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. तर प्रकल्प कार्यालय, कळमनुरी व प्रकल्प कार्यालय, पुसद यांनी अनुक्रमे कळमनुरी व पुसद पोलीस स्टेशन येथे दोषींविरूद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार कळमनुरी व पुसद पोलीस स्टेशन येथे संबंधित संस्थेवर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी शिवप्रेमी दुर्गप्रेमी यांनी आझाद मैदानात केलेले आंदोलन

**(२) ४९५११ (१७-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्यभरातून शिवप्रेमी दुर्गप्रेमी मुंबईतील आझाद मैदानात एकवटले असून शिवप्रेमी व दुर्गप्रेमीच्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री महोदयांनी राज्यात गड-किल्ल्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाची पूर्तता होण्याबाबत तसेच गड-किल्ल्यांच्या संवर्धनाकरिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०२४) :** (१) राज्यातील गड-किल्ल्यांच्या जतन-संवर्धनासाठी दुर्गप्रेमी तरुणांनी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन केले होते, त्याप्रसंगी मा.मुख्यमंत्री महोदयांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांचे निवेदन स्विकारले. त्या निवेदनात गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी महामंडळाची स्थापना करण्याच्या मागणीचा समावेश आहे.
(२) राज्यातील गड-किल्ल्यांसह राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व संवर्धनाची कामे नियमित निधीतून करण्यात येतात. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जतन व संवर्धनाच्या कामांसाठी एकूण रु.१९०.१५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जतन व संवर्धनाच्या कामांसाठी एकूण रु.२५८.६६ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्य संरक्षित स्मारकांचे सुनियोजित व्यवस्थापन करण्याच्या हेतूने राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, स्मारकस्तरावर महावारसा समिती स्थापन करण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक १६.०२.२०२४ नुसार घेण्यात आला आहे. उपलब्ध निधी व निकषांच्या अधिन राहून गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाच्या कामाचे नियोजन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बड़ीपोड (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे कोलाम पोडावार जाणाऱ्या रस्त्याकरिता निधी मंजूर करण्याबाबत**

**(३) ६००५९ (०२-०५-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बड़ीपोड (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथे कोलाम पोडावार जाण्याकरिता नागरिकांना पक्का रस्ता नसल्याने तसेच पावसाळयामध्ये पोडावर चारचाकी वाहने जाऊ शकत नसल्याने पोडावरील नागरिकांना सोई - सुविधा पुरविण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यामध्ये यापूर्वी कोलाम पोड मुख्य रस्त्याला जोडण्याचा कार्यक्रम घेण्यात आला व पोड जोडणीच्या निधीमधून कोलाम पोड जोडण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बड़ीपोडावर येथील सर्व शाळा, अंगणवाडी यांना ई- सोई सुविधा पुरविल्या असून विकासाच्या दृष्टीने असलेल्या मुख्य रस्त्याचे काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्ह्यातील कोलाम पोड जोडणी कार्यक्रम घेवून रस्ता बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१८-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) माहे जुलै, २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात आदिवासी उपयोजनांतर्गत रु.१.२५ कोटी इतक्या किंमतीचे "पालोती ते मारेगांव ग्रामा १८१ ते बडीपोड जोडरस्ता बांधकाम व मोरीचे बांधकाम करणे ता.कळंब जि.यवतमाळ" काम मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून खंडकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनीना दहा वर्षानंतर विक्रीस परवानगी मिळण्याबाबत**

**(४) ६०८४९ (२१-०४-२०२३). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून खंडकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनी दिनांक ०४/०५/२०१२ चे शासन परिपत्रक, दिनांक ०८/११/२०१२ चे शासन शुद्धी परिपत्रक व १४/०२/२०१३ च्या शासन परिपत्रकानुसार खंडकऱ्यांना दहा वर्षानंतर खरेदी-विक्री व्यवहार करता येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिन विक्री करावयाची झाल्यास चालू बाजारभाव प्रमाणे ५०% रक्कम नजराणा म्हणून शासनाला भरावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्मिला उद्धव केसकर व उपेंद्र उद्धव केसकर राहणार मेडद तालुका माळशिरस यांच्या वडिलांना ०१/१२/१९७५ रोजी शेती महामंडळाकडून मिळालेली जमीन दहा वर्षापेक्षा अधिकचा काळ होऊन देखील केसकर कुटुंबीयांना सदर जमीन विक्री करण्यासाठी परवानगी मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुय्यम निबंधक कार्यालयाकडून केसकर कुटुंबियांना शेती महामंडळाने दिलेल्या जमिनी महामंडळाने लॉक केल्या आहेत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, केसकर कुटुंबियांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे न्याय मागण्यासाठी अर्ज केला असता याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविले असून अद्यापपर्यंत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले नसल्याचे उक्त कुटुंबियांना तहसीलदार माळशिरस कार्यालय यांनी कळविले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.आयसीएच-२०१२/प्र.क्र.१२९(सदाशिवनगर)/ल-७, दिनांक १४/०२/२०१३ मधील तरतुदींनुसार खंडकरी शेतकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनींची १० वर्षांच्या आत विक्री करावयाची झाल्यास चालू बाजार भावाच्या ५० टक्के रक्कम नजराणा म्हणून शासनाला जमा करण्याचे प्रावधान आहे. तथापि, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोटकलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) अन्वये माजी खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन पत्र क्र.मशेम-२०१५/प्र.क्र.६२/ल-७, दिनांक २०/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांना माजी खंडकरी यांना वाटप केलेल्या जमिनीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(६) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (सुधारणा) अधिनियम,२०२३ अन्वये उक्त अधिनियमामध्ये कलम २८-१ (अअ) मधील पोटकलम (३) खाली नवीन पोटकलम (३-१अ) अन्वये माजी खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.

---

### धाराशिव येथील भोगवटदार- २ च्या जमिनी भोगवटदार-१ मध्ये रूपांतर करण्याबाबत

**(५) ६१४४६ (२१-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील भोगवटादार-१ च्या जमिनीचे भोगवटादार-२ मध्ये रूपांतर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला तसेच भोगवटादार वर्ग-२ मध्ये सूचित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ रोजी वा त्यासुमारानंतर सुमारे ७५ वर्षांनंतर मराठवाड्यात भोगवटादार-१ मधून भोगवटादार-२ मध्ये जमिनी रूपांतर करण्याची निश्चित कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ७ जून, २०१८, २९ सप्टेंबर, २०१८ व २ जानेवारी, २०२२ नुसार विदर्भातील भोगवटादार-२ च्या जमिनी भोगवटादार-१ मध्ये नि:शुल्क रूपांतर केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील भोगवटादार-२ च्या जमिनी भोगवटादार-१ मध्ये रूपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

शासन अध्यादेश, महसूल व वन विभाग दिनांक २१.०४.२०१८ अन्वये विदर्भातील भूमीधारी आणि हस्तांतरणाच्या निर्बंधासह भूमीस्वामी धारणाधिकाराने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ म्हणून समजण्यात येतात. तसेच, शासन परिपत्रक, दिनांक ७ जून, २०१८ व दिनांक २९ सप्टेंबर २०१८ अन्वये संबंधित जमिनी ह्या भोगवटादार वर्ग-१ मध्ये परावर्तीत करण्याची कार्यपध्दत विहीत केलेली आहे.

(४) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये कृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारावर किंवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, शासन पत्र दिनांक १२ मार्च, २०२४ अन्वये अधिमूल्याची रक्कम भरण्याबाबतची मुदत दिनांक २८ जून, २०२४ पर्यंत देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नगरपरिषद आस्थापनेवरील रोजंदारी सेवेतून कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना लाड, बर्वे व मलकानी समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(६) ६२५१८ (२४-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यांमधील नगरपरिषद मधील सन १९९३ पूर्वीचे तसेच सन २००० पूर्वीचे रोजंदारी सेवेत असलेल्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबत लाड, बर्वे व मलकानी समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच नगरपरिषद आस्थापनेवरील रोजंदारी सेवेतून कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना लाड व बर्वे मलकानी समितीच्या शिफारशी लागू करणेबाबत प्रधान सचिव (नवि-२) यांना सदरील प्रस्ताव तपासून सादर करण्याचे आदेश दिनांक १०.१.२०२३ रोजी व त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त नगरपरिषद आस्थापनेवरील कायम झालेल्या कर्मचाऱ्यांना सदरहू समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) लाड पागे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत शासनाने दिनांक २४.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण लागू केले आहे. त्या दरम्यान सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र.३९५०/२०२३ दाखल केली आहे. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १०.४.२०२३ रोजीच्या आदेशानुसार वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गाव्यितिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नोकरी मिळण्याबाबत पुढील आदेश होईपर्यंत नियुक्ती देण्यास स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सद्य:स्थितीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ११.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये भंगी, मेहतर व वाल्मिकी या जातींबरोबर ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, कोरार, झाडमल्ली, हेला, डोम व डुमार या जातींमधील उमेदवारांना दिनांक २४.२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार वारसाहक्काने नियुक्ती देण्यास मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाढत्या औद्योगिकीकरणामुळे रायगड जिल्ह्याची "भाताचे कोठार" अशी असलेली ओळख पुसली जात असल्याबाबत

**(७) ६५२४८ (२४-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण तसेच नव्या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन होत असल्यामुळे शेती क्षेत्रात घट होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात १ लाख २४ हजार हेक्टर लागवडीखाली शेतीक्षेत्र असताना सन २०१८-२०१९ पर्यंत घटून १ लाख ११ हजार पर्यंत आला असून मागील पाच वर्षात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होऊन फक्त ९८ हजार हेक्टर क्षेत्रावर भातशेती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शेती प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्याची तयारी नसल्यामुळे तसेच सिंचनाच्या तुटपुंज्या योजना आणि शेतमालाला न मिळणारा हमी भावामुळे शेतकऱ्यांचा शेती विकण्याकडे कल वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू 'भाताचे कोठार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बहुतांशी शेतजमिनी विविध प्रकल्पात जात असल्यामुळे ७१ टक्के हे अत्यल्प तर १६ टक्के शेतकरी अल्पभूधारक झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच रायगड जिल्ह्याची ओळख म्हणून "भाताचे कोठार" पुसली जात असून शेतीक्षेत्रात मोठी घट होत आले असून मागील पाच वर्षात भातशेती क्षेत्र १३ हजार हेक्टरने घटले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेती करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याबाबत तसेच सिंचनाच्या विविध योजनांचा १०० टक्के लाभ देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या तसेच माहिती घेवून येथील भातशेतीला आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाची जोड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२४-०६-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यात सन २०१८-२०१९ मध्ये १ लाख ११ हजार हेक्टर भात पिकाचे क्षेत्र होते त्यामध्ये घट होवून सन २०२३-२४ मध्ये ८९ हजार हेक्टर क्षेत्रावर भात शेती केली जात आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.
(५) अंशत: खरे आहे.

मागील पाच वर्षात भातशेती क्षेत्रामध्ये २१ हजार ६९६ हेक्टर ने घट झाली आहे.
(६) शेतकऱ्यांमध्ये आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणाबाबत मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कार्यक्रम, शेतीशाळा, प्रात्यक्षिके, क्रॉपसॅप, कृषि महोत्सव अशा विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम व जिल्हा वार्षिक योजनअंतर्गत मोठ्या प्रमाणात सिंचन सुविधा निर्माण करण्यात येत आहेत.
(७) संबंधित नाही.

---

**सातारा येथे जिल्हास्तरिय तांत्रिक समितीने पिके आणि फळबागांना हेक्टरी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) ६५६९२ (२५-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा येथे शेतकऱ्यांना शेतीसाठी मदत करण्यासाठी जिल्हास्तरिय तांत्रिक समितीने पिके आणि फळबागांना हेक्टरी कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सर्वसाधारण द्राक्षे बागांसाठी २ लाख २१ हजार, निर्यातक्षम द्राक्षांसाठी ३ लाख १८ हजार व सर्वसाधारण स्ट्रॉबेरीसाठी ४ लाख २९ हजार तसेच व्हर्टिकल स्ट्रॉबेरीसाठी ५ लाख ४६ हजार व डाळिंब पिकासाठी १ लाख ३६ हजार इतके कर्ज देण्याचा निर्णय बँकांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे तसेच उर्वरित शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१४-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे
(३) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सर्वसाधारण व निर्यातक्षम द्राक्ष पीक तसेच सर्वसाधारण व व्हर्टिकल स्ट्रॉबेरी पिक घेणाऱ्या एकूण ११,४७५ शेतकऱ्यांना रु.९८.३९ कोटी इतके कर्जवाटप केले आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सदर कर्जवाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ आणि मराठी चित्रपट निर्मात्याने तालुका पातळीवर ३०० नवीन सिनेमागृहे उभारण्याची केलेली मागणी**

**(९) ६७५३२ (२४-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ आणि मराठी चित्रपट निर्मात्याने तालुका पातळीवर तब्बल ३०० नवीन सिनेमागृहे उभारण्याची मागणी सरकारकडे केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात थिएटरची संख्या कमी होत असल्याने महाराष्ट्रभर नवीन थिएटर्स उभारण्याची गरज असून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी १५० ते २०० क्षमतेची लहान थिएटर्स उभारावी अशी मागणी महामंडळाने आणि मराठी चित्रपट

निर्मात्यानी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सरकारने प्रत्येक एसटी स्टँडवर १५ हजार स्क्वेअर फूटाची जागा दिली तर दोन सिनेमागृहे बनू शकतात त्यासाठी महामंडळ तसेच खाजगी संस्थाही तयार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे सिनेमा गृहावर चार आठवड्याची सक्ती न करता सिनेमा चांगला नसेल तरी छोट्या सिनेमागृहाची निर्मिती केल्यास प्रत्येक थेटरमध्ये मराठी चित्रपट दाखवणे शक्य होणार आहे त्याचबरोबर मराठी सिनेमांना देण्यात येणारे अनुदान वाढवून देण्याची मागणी मराठी चित्रपट निर्मात्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१), (२), (३) व (४) नाही, हे खरे नाही.
याबाबत मा. मुख्यमंत्री सचिवालय, गृह विभाग व या विभागाकडे सदरचे निवेदन अप्राप्त आहे.
या विभागाच्या दिनांक २९.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्ह्याच्या ठिकाणी बंदिस्त नाट्यगृह बांधण्याची योजना कार्यान्वित असून, सिनेमागृहे उभारण्याची योजना या विभागामार्फत राबविली जात नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर दोन सदस्यीय प्रशासक मंडळ नियुक्त केल्याबाबत**

**(१०) ६७८६२ (२५-०८-२०२३). श्री.राजेंद्र राऊत (बार्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकार आयुक्त यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर दोन सदस्यीय प्रशासक मंडळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त केले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासकाची दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहकार कायदा कलम ११०-अ नुसार सहकारी बँकेवर केवळ प्रशासक नेमण्याची तरतूद असून प्रशासक मंडळ नेमण्याची तरतूद नसल्याचे शासनाच्या विधी व न्याय खात्याने स्पष्ट अभिप्राय दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सहकार आयुक्त यांनी सहकार कायदा कलम ११०-अ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन व विधी व न्याय खात्याच्या अभिप्रायाकडे दुर्लक्ष करुन दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर दोन सदस्यीय प्रशासक मंडळ नेमले असून याबाबत शासन भूमिका घेणार आहे वा घेण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये बँकेवर नियुक्त करावयाच्या प्रशासकाबाबतचे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेवर नियुक्त केलेल्या प्रशासक मंडळाबाबतचे अभिप्राय सहकार आयुक्त कार्यालय यांना कळविण्यात आले असुन त्यानुसार त्यांच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या आदेशात सुधारणा करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.
त्यानुसार सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये सोलापूर बॅंकेवर श्री. कुंदन भोळे, उपनिबंधक, सहकारी संस्था यांची एकमेव प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धानोरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरांना थकीत मजुरी मिळण्याबाबत

**(११) ६८०४५ (२८-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील दुर्गापूर, मोहगाव, फुलबोडी, साखेरा, मुंगणेर, कुलभट्टी व खामतळा या नक्षलग्रस्त भागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व मानव विकास मिशन या दोन्ही योजनांच्या अभिसरातुन माहे नोव्हेंबर ते डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अंगणवाडी इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना आठवड्याभरात मजुरी अदा करण्याचा निकष असतानाही मजुरांना मागील सहा महिन्यापासून मजुरी अदा करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन व्याजासह मजुरी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१३-०६-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) तालुका धानोरा येथील ग्रा. पं. दुर्गापूर, मोहगाव, फुलबोडी, साखेरा, मुंगणेर, कुलभट्टी व खामतळा येथील अंगणवाडी इमारत बांधकाम कामावरील दिनांक ०३/१०/२०२३ पर्यंत एकूण १११ हजेरीपत्रक रक्कम रु.१३३९५५५/-निर्गमित केलेले होते. त्यापैकी रक्कम रु.१३२७३३६/- मजूरी, मजुरांच्या खात्यात जमा झालेली आहे. उर्वरित रक्कम रु.१२२१९/- ग्राम पंचायत साखेरा व फुलबोडी मधील एकुण ३ हजेरीपत्रकांवरील ८ मजुरांची मजूरी अद्यापही जमा झालेली नाही. उर्वरीत मजुरांची मजुरी ही DBFL (Debit Failure) या तांत्रिक कारणांमुळे अर्धवट Reject झाल्याचे दिसून येते. त्यामुळे ते पुर्नप्रक्रियेकरिता उपलब्ध होत नाहीत. याबाबत केंद्र शासनासोबत मेलद्वारे सातत्याने संपर्क साधला जात आहे. नरेगा प्रणाली मध्ये व्दितीय स्वाक्षरीधारकाने ८ दिवसाचे आत जर मजूरीचे FTO स्वाक्षरीत केले नाही तर विलंब शुल्क लागु होते. तथापि, सदर प्रकरणी व्दितीय स्वाक्षरी धारकाने विहीत कालावधीत FTO स्वाक्षरीत केला असल्याने विलंब शुल्क अदा करावयाचा प्रश्न उद्भवत नाही. सदर ८ ही मजुरांची मजुरी वेळेत MIS केल्यामुळे विलंब शुल्क सदर मजुरांना लागू नाही.

(४) तांत्रिक अडचणीमुळे विलंब झालेला आहे.

---

## शिंदोळा खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना विभागामध्ये होत असलेला गैरप्रकार

**(१२) ६८२४६ (२८-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदोळा खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील ग्रामपंचायत अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना विभागामध्ये (एम.आर.ई.जी.एस) गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गैरप्रकाराबाबतची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१८-०६-२०२४) :** (१) हे अंशत:खरे आहे
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याकरीता निर्देशित करण्यात आले आहे त्यानुषंगाने प्रचलित नियम व धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औसा (जि.लातूर) तालुक्यात निळकंठेश्वर देवस्थान किल्लारी यांना जमीन देण्याबाबत

**(१३) ६८३४१ (२५-०८-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यात निळकंठेश्वर देवस्थान किल्लारी यांना जुन्या गावठाणातील जमीन देण्याबाबतची सर्व त्रृटीची पूर्तता अहवालासह प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास्तव दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्तावाची विभागीय आयुक्त स्तरावरून तपासणी करून मान्यतेसाठी शिफारशीसह शासनास सादर करणे अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव माहे जानेवारी, २०२३ पासून आजतागायत विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथेच प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरील प्रस्ताव मंजुरीबाबत शासनास किती कालावधी लागेल व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०६-२०२४) :** (१) व (२) जिल्हाधिकारी, लातूर कार्यालय यांचेकडून दिनांक ५.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.
विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या दिनांक ९.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर करण्यात आला.
(३) जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयाकडून दिनांक ५.१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून त्रृटी उपस्थित करण्यात येवून त्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक १४.८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.
(४) मौ. किल्लारी, ता.औसा येथील श्री निळकंठेश्वर देवस्थानच्या मुलभूत सुविधांसाठी जून्या गावठाणातील ५.०० हे.आर. जागा देवस्थानच्या नावे वर्ग करण्यासाठीच्या प्रस्तावावर शासनाकडून नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### केंद्र सरकारच्या “मिशन अमृत सरोवर” या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत

**(१४) ६९२९१ (११-०९-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने जलसंकटावर मात करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील “मिशन अमृत सरोवर” हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला असून या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक एकर क्षेत्रफळाचे ७५ अमृत सरोवर निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे, मात्र माहे एप्रिल, २०२३ चा महिना होऊनही सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन उक्त प्रकल्पाचे काम अपेक्षित दिवसांत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामंजस्य करार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येतात. राज्यातील ३४ जिल्ह्यांपैकी भंडारा, गोंदिया, वर्धा व सातारा या ४ जिल्हयांनी सामंजस्य करार केलेले आहेत. इतर जिल्ह्यांमध्ये रोहयो, नरेगा, C.S.R., जिल्हा वार्षिक योजना व अन्य योजनेच्या माध्यमातून कामे पूर्ण करण्यात आलेली असल्याने अन्य ३० जिल्ह्यांमध्ये सामंजस्य करार करण्यात आलेले नाहीत. प्रकल्पाचे काम अपेक्षित दिवसात पूर्ण झाल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(३) केंद्र सरकारच्या अमृत सरोवर अभियानातर्गत प्रत्येक जिल्हयात ७५ प्रमाणे राज्यातील ३४ जिल्ह्यांत एकूण २५५० अमृत सरोवरांचे ईष्टांक प्राप्त झाले आहे ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यत पूर्ण करणे अपेक्षित होते. राज्यात दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत २९५६ अमृत सरोवर कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच, आज रोजी राज्यात ३०१२ अमृत सरोवर कामे पूर्ण झालेली आहेत, सदर संख्या ही राज्याकरीता निर्धारित इष्टांकापेक्षा १८% जास्त आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात जिल्हा बँक संचालकांना सुधारित दराने दैनिक भत्ता,**
**बैठक भत्ता व प्रवास खर्च मिळण्याबाबत**

**(१५) ७०११७ (२७-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ रोजी सुधारित दराने दैनिक भत्ता, बैठक भत्ता आणि प्रवास खर्च मसुदा दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून अंमलात येऊन मागील १२ वर्ष मसुद्याप्रमाणे जिल्हा बँक संचालकांना भत्ते, बिल आणि प्रवास खर्च अनुज्ञेय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हा बँक संचालकांना प्रवास भत्ता, पेट्रोल (कारसाठी) रुपये ११.२५/- (प्रती कि.मी.), डिझेल (कारसाठी) रुपये ८.७५ (प्रती कि.मी.) तर दैनिक भत्ता रुपये ४७०/-, बैठक भत्ता रुपये १८०/- बँकेकडून देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सन २०११ मध्ये पेट्रोलदर रुपये ६३.०८ व डिझेल दर रुपये ३७.७५ इतके होते, मात्र सन २०२३ मध्ये पेट्रोल दर रुपये १०७.८८ व डिझेल दर रुपये ९४.२१ इतके भरमसाठ वाढले असून वाढती महागाई आणि इंधनाचे वाढीव दर पाहता जिल्हा बँक संचालकांना दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून अंमलात आलेल्या दराने मिळणारे भत्ते, बिल आणि प्रवास खर्च हा खूपच कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत वाढती महागाई आणि इंधनाचे वाढते दर पाहता जिल्हा बँक संचालकांना प्रवास भत्त्यात समाधानकारक वाढ, दैनिक भत्ता रुपये २०००/- व बैठक भत्ता रुपये १०००/- अशी अपेक्षित वाढ होण्याबाबत शासन सुधारित अधिनियम लागू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२४) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) वाढती महागाई आणि इंधनाचे वाढते दर पाहता सहकारी संस्थांच्या संचालकांना प्रवास भत्त्यामध्ये समाधानकारक वाढ करण्याच्या अनुषंगाने सहकार, पणन वस्त्रोद्योग विभागाकडुन दिनांक ०५.०७.२०२३ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच यानुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम, १०७ अ मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार दैनिक भत्ता रु.२००० व बैठक भत्ता रु.१००० अशी वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची घरकुल योजनेची यादी व लाभार्थ्यांनी दिलेले अर्ज शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ७०६३६ (१२-०९-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन परिक्षेत्रातील कुडाचे कच्चे घर व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असणाऱ्या कुटुंबियांसाठी प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून, या योजनेचे अंमलबजावणी करणेसाठी कोणते निकष निर्धारित करण्यात आले आहेत,
(२) असल्यास, वाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७५ घरकुल लाभार्थ्यांची कच्च्या कुडाच्या घरांची यादी वाडा नगरपंचायतीकडून सन २०१८ या वर्षात पाठविलेली यादी शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घरकुल वाटप योजनेसाठी नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांकडून कच्च्या घरांचा सर्वे करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार वाडा शहरातील प्रधान मंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना कच्च्या व कुडाच्या घरांची तसेच बेघरांना पक्की घरे मिळण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०६-२०२४) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लाभार्थ्यांच्या पुढाकाराने वैयक्तीक स्वरुपाचे घर बांधणीकरीता अनुदान (Beneficiary Led Construction) या घटकासाठी महत्त्वाचे निकष पुढीलप्रमाणे :-
(अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची जागा असणे आवश्यक आहे.
(ब) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी आर्थिक मर्यादा रु.३ लक्ष पर्यंत ठेवण्यात आली आहे.
(क) आर्थिक सहाय्याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांने त्यांच्या मालकीच्या उपलब्ध असलेल्या जमिनीच्या कागदपत्रांसह संबंधित नकाशे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जमा करणे आवश्यक आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) वाडा नगरपंचायतीद्वारे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तीक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान अंतर्गत एकूण १५७ (१०३ व ५४ घरकुले) लाभार्थ्यांच्या २ घरकुल प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली होती. परंतु, सदरहू लाभार्थी स्वमालकीची कागदपत्रे सादर न करु शकल्याने संबंधित लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी देण्यात आली नाही. तसेच सदर योजनेचे काम सुरु न झाल्याने कोणताही निधी म्हाडा कार्यालयाकडून वाडा नगरपंचायतीस वितरित करण्यात आला नाही.

सदर दोन्ही घरकुल प्रकल्प रद्द करण्याकरीता सादर केलेल्या प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) च्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ च्या ६८ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्यामुळे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र जमा करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत

**(१७) ७१५१९ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेण्यासाठी ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रमाणपत्र काढण्यासाठी संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्यामुळे प्रमाणपत्र निघण्यासाठी वेळ लागत असल्याने विद्यार्थ्यांना व त्यांचा पालकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रमाणपत्रामुळे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेण्यासाठी विलंब होत असून प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ मिळणेसाठी सदरील विद्यार्थ्यांकडून व त्यांच्या पालकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत वाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी २०१८ अधिनियम रद्द केल्याने मराठा समाजास आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्लूएस) आरक्षण अनुज्ञेय करण्यात आले.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
दर महिन्याचा सरासरी प्राप्त होणाऱ्या प्रमाणपत्र अर्जाच्या तुलनेत आहे. माहे जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये प्रमाणपत्र अर्जाचे प्रमाण पाच ते सहा पट वाढल्याने सर्व्हरची क्षमता ओलांडली गेली, परिणामी वेब सेवांची कार्यक्षमता कमी झाली. फार मोठ्या प्रमाणातील अर्जांना सामावून घेण्यासाठी महा आय टी ने तातडीने सर्व्हरची संख्या वाढवण्यासाठी पुढाकार घेतला आता सर्व्हरची कार्यक्षमता सुधारली गेली आहे आणि एका दिवसात १,६०,००० हून अधिक अर्जावर प्रक्रिया करुन प्रमाणपत्र वितरित केले जात आहेत. इन्फ्रास्ट्रक्चर आणि सपोर्ट टीम सतत ॲप्लिकेशनचे निरीक्षण करत आहेत. सद्यस्थितीत सर्व्हर संदर्भातील तांत्रिक अडचण दुरुस्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## कळवण (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील प्रकल्पात पटपडताळणी केली असता काही विद्यार्थी गैरहजर असल्याबाबत

**(१८) ७१७७१ (०८-०२-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय अनुदानित आश्रमशाळा व नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रकल्पात पटपडताळणी कार्यक्रमात सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांची अचानक केलेल्या तपासणीत काही विद्यार्थी गैरहजर असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कळवण प्रकल्प कार्यालयांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये प्रवेशित असलेल्या एकूण ४४७७९ इतक्या विद्यार्थ्यांपैकी १४८५ इतके विद्यार्थी हे गैरहजर असल्याचे पटपडताळणीत आढळून आलेले आहे.
(२) गैरहजर विद्यार्थ्यांबाबत संबंधित आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांचे लेखी खुलासे प्रकल्प अधिकारी कार्यालय, कळवण यांनी घेतले असून गैरहजर विद्यार्थ्यांबाबत चौकशी केली असता सदर विद्यार्थी साखरपुडा, लग्नसंमारंभ, गणेशोत्सव इत्यादी कार्यक्रम तसेच गालफुगी या कारणांनी विद्यार्थी गैरहजर असलेबाबत आढळून आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील कचरा व्यवस्थापनातील झुम प्रकल्पास वीज पुरवठा करण्याबाबत

**(१९) ७२३४५ (१५-०२-२०२४). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी झुम प्रकल्प विज जोडणी केली नसल्यामुळे उक्त कचरा प्रकल्प सुमारे ३ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प बंद असल्यामुळे दररोज ५० टन कचऱ्याची भर पडत असून त्यावर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया करण्यात येत नसल्याने वातावरण दुषित होत असल्यामुळे येथील स्थानिक सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन प्रकल्पास तातडीने वीज पुरवठा करून झुम प्रकल्प पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२४) :** (१) कोल्हापूर शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुरु करण्यात येत असलेल्या झुम प्रकल्पासाठी शेडचे स्थापत्य काम करणे आवश्यक असल्यामुळे सदरचा प्रकल्प बंद अवस्थेत होता. सद्यस्थितीत शेडच्या कामासोबतच उच्च दाब केबल, ए.बी.स्विच, ट्रान्सफॉर्मर कट्टा ही कामे देखील पूर्ण करण्यात आली आहेत. विज वितरण कंपनीकडून त्याठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसवून कनेक्शन मिळताच प्रकल्प सुरू करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.
(२) व (३) कोल्हापूर शहरातील संकलित होणाऱ्या घनकचऱ्यावर एकूण ४ प्रकल्पांव्दारे प्रक्रिया केली जाते.याव्यतिरिक्त भविष्यकालिन उपाययोजना म्हणून महानगरपालिकेने ५३ टन Windro Composting प्रकल्पाच्या ३ नवीन शेडची उभारणी केली असून प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून कचऱ्यावर प्रक्रिया करुन शहरातील वातावरण सुयोग्य ठेवण्यासाठी महानगरपालिका सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिका नवीन इमारतीच्या प्रस्तावाबाबत

**(२०) ७२३४६ (१५-०२-२०२४). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेची इमारत सन १९५५ पूर्वी उभारण्यात आली असून आजतागायत सदर इमारतीमध्ये महापालिकेचे कामकाज सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत / सभागृह अपुरे पडत असल्यामुळे नवीन इमारतीसाठी सुमारे १४३ कोटीचा प्रस्ताव कोल्हापूर महानगरपालिका यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रस्तावास शासनाने मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये रु.१४३.५३ कोटी रकमेची तरतूद करुन त्यापैकी पहिल्या टप्प्यातील महासभा सभागृह बांधकामासाठी रु.५८.४३ कोटी निधी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनास सादर केला असून सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण न झाल्याने खर्चात वाढ झाल्याबाबत**

**(२१) ७२५७४ (१५-०२-२०२४). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला ते सांताक्रुझ मार्गे बीकेसी, कलिना व वाकोला या भागातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन २०१६ मध्ये ४४९ कोटी रुपये किमतीचा सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या प्रकल्पाचे काम आता ६६९ कोटी रुपयावर जाऊन अलिकडेच या प्रकल्पासाठी २३.५८ कोटी रुपयाची वाढ जे.कुमार इन्फ्रा प्रोजेक्टस् या कंत्राटदार कंपनीला प्राधिकरणाने मंजूर करण्यात आले असल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीस माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कंत्राट मंजूर करताना ३६ महिन्यात काम संपविण्याचे कार्यादेश देण्यात येऊनही नियोजित वेळेत काम पूर्ण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त सांताक्रुझ चेंबूर जोड रस्त्याच्या (एससीएलआर) या प्रकल्पाच्या खर्च ४४९ कोटीहून ६६९ कोटी रुपयावर जाण्याची तसेच कंत्राटदार कंपनीस २३.५८ कोटी रुपयाची वाढ करुन देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासह शासनाच्या निधीचा अपव्यय होऊ नये याकरिता शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भूसंपादन, विकास आराखड्यात रस्त्याच्या रुंदीमध्ये झालेला बदल, ROW मधून झोपड्या काढण्यसाठी लागलेला कालावधी, कोव्हीड-१९ मुळे कामावर झालेला परिणाम, सेवावाहीन्याचे स्थलांतरण तसेच वृक्षतोड परवानगी मिळण्यास झालेला विलंब इत्यादी कारणांमुळे कार्यादेश देण्यात येऊनही नियोजित वेळेत काम पूर्ण होऊ शकले नाही.
(३) प्रकल्पाच्या मूळ खर्चामध्ये खालील कारणांमुळे वाढ झालेली आहे.
१) पाईल फाउंडेशनच्या खोलीमध्ये झालेली वाढ, बाधित मलनिसा:रण वाहिन्यांचे व जल वाहिन्यांचे स्थलांतरण करणे.
२) संरक्षक भिंत व पर्जन्य जलवाहिनीचे काम करणे.

३) डेकच्या क्षेत्रफळामध्ये झालेल्या वाढीमुळे लागणारा अतिरिक्त खर्च व वाकोला आर्मचे पानबाई इंटरनॅशनल शाळेपर्यंत विस्तारिकरण करणे.
४) केबल स्टेच्या सहाय्याने वाकोला पुलाच्या वरुन जाणाऱ्या वाकोला पाहोच मार्गाचे बांधकाम करणे.
५) मिठी नदीवरील व हंसबुग्रा मार्गावरील पुलाचे नुतनीकरण व रुंदीकरण करणे.
६) बुलेट ट्रेनमुळे बाधित होत असलेल्या पुलाच्या स्पॅनची वाढलेली लांबी तसेच प्रकल्पातील पिअर क्र.PP८७A हा मेट्रो लाईन ३ च्या टनेलवर येत असल्याने पिअरच्या पाईपची खोली ८.५ मी वरुन २५ मी. करण्यात आली.
७) वाहतूक पोलीस विभागाने पोर्टल पिअर PP८७A व PP८८ हे सर्विस रोडमध्ये येत असल्याने सदर पिअरची जागा बदलण्यास सांगितले असल्याने सदर ब्रिज वाकोला जंक्शन येथील भूमितीय रचना १०० अंशात वक्राकार, १०० मीटर त्रिज्या व १०५ मीटर लांब स्पॅन असून ब्रीजचे सविस्तर डिजाईन करताना संरचनेतील गुंतागुंतीमुळे केबल स्टे ब्रीज प्रकार करावा लागला आहे.
(४) सदरील कामे व त्यावरील खर्चास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. सदरील खर्च प्राधिकरणाकडील निधीतून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड शहरात ऑटोरिक्षा थांबे उभारण्याबाबत

**(२२) ७२६२१ (०८-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरात १२ हजारापेक्षा जास्त ऑटोरिक्षा असून कमी थांबे असल्याने वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑटोरिक्षा थांब्याची संख्या वाढविण्याबाबत ऑटो चालकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने आढावा घेऊन शहरातील ऑटोरिक्षामुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०२४) :** (१) नांदेड शहरात एकूण ४२९८ ऑटोरिक्षा परवानाधारक आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) आयुक्त महानगरपालिका नांदेड, पोलीस निरिक्षक शहर वाहतूक शाखा, प्रवासी संघटना व ऑटोरिक्षा संघटनांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ऑटोरिक्षा थांब्यांबाबत सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. सदर सर्व्हेक्षण अहवालाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नांदेड यांनी ९७ ऑटोरिक्षा थांब्यांना मान्यता दिली आहे. तसेच, ऑटोरिक्षा थांबे निश्चित केलेल्या ठिकाणी फलक प्रदर्शित करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

महानगरपालिकेतर्फे ८६ थांब्यांचे फलक लावण्यात आले. वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर शहर वाहतूक शाखा नांदेड यांच्यामार्फत कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जालना येथे बोगस व्यक्तींनी फळबाग विमा योजनेत सहभाग घेतल्याबाबत

**(२३) ७२६७८ (११-०२-२०२४). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथे अनेक बोगस व्यक्तींनी फळबाग नसतानाही फळबाग विमा योजनेत सहभाग घेतला असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली असता फळबाग नसताना सुमारे ७,९२७ बोगस व्यक्तींनी फळबाग विमा योजनेत सहभाग घेतला असल्याचे तसेच याबाबत बोगस विमा प्रकरणावर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२६-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आंबिया बहार सन २०२२-२३ मध्ये जालना जिल्ह्यातील एकूण सहभागी ४७,६८३ शेतकऱ्यांपैकी ७,९२७ शेतकऱ्यांनी बोगस विमा उतरविल्याचे दिसून आले आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विमा कंपनीकडे जमा असलेली बोगस विमाधारक शेतकऱ्याची शेतकरी हिस्सा रक्कम केंद्र शासनाच्या तंत्रज्ञान निधीमध्ये जमा करण्यांच्या सूचना संबंधित विमा कंपनीस देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही विमा कंपनीस्तरावरून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अकोला जिल्ह्यातील महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाच्या गोदामातून लाखो रुपयांची किटकनाशके गायब झाल्याबाबत

**(२४) ७२८११ (१३-०२-२०२४). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमएआयडीसी) विभागीय कार्यालयातील गोदामात ठेवलेली ३८ लाख ९१ हजार किंमतीचा किटक नाशकांचा साठा गायब झाल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामाचे लिपिक तथा भांडारपाल यांनी केलेल्या व्यवहारात ३८ लाख ९१ हजार रुपये किंमतीचा साठा पुरविल्याबाबत बनावट चलने सादर केल्याचे विभाग अधिकाऱ्यांनी केलेल्या साठा पडताळणीत आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामंडळाकडून विभागीय व्यवस्थापक यांनी केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. सत्य शोधन समितीच्या दिनांक २०/१०/२०२२ च्या अहवालानुसार निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) श्री. मंदार वाशिमकर, लिपीक तथा भांडारपाल यांनी केलेल्या अफरातफरीबाबत महामंडळाचे अकोला येथील विभागीय व्यवस्थापक यांनी एम.आय.डी.सी. पोलिस स्टेशन, अकोला येथे FIR क्रमांक ०२५२/२०२३ हा दिनांक २९/०७/२०२३ रोजी दाखल केला आहे. श्री. वाशिमकर यांनी जिल्हा सत्र न्यायालय, अकोला येथे अटक पूर्व जामिन मिळण्याकरीता दाखल केलेला अर्ज मा. न्यायालयाकडून फेटाळण्यात आला होता. तद्नंतर मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाकडून क्रिमिनल ॲप्लीकेशन (अेबीए) क्रमांक ६२२/२०२३ मध्ये दिनांक १५/०९/२०२३ च्या आदेशान्वये श्री. वाशिमकर यांचा जामिन अर्ज मंजूर केला आहे. याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

(४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या दिनांक ०४/०५/२०२३ च्या आदेशान्वये श्री. वाशिमकर यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच अफरातफरीबाबत एम. आय.डी.सी. पोलिस स्टेशन, अकोला येथे FIR क्रमांक ०२५२/२०२३ हा दिनांक २९/०७/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. श्री. वाशिमकर यांच्याविरुध्द दिनांक ०४/०५/२०२३ अन्वये दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांना दुप्पट अनुदान आणि ऐतिहासिक चित्रपटांना एक कोटी रुपये अनुदानाची घोषणा केल्याबाबत

**(२५) ७२८६९ (०८-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांना दुप्पट अनुदान आणि ऐतिहासिक चित्रपटांना एक कोटी रुपये अनुदानाची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षाच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांना अद्यापी अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ऐतिहासिक चित्रपटांना अनुदान देण्यासंदर्भात मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या शिफारशी अंती ऐतिहासिक चित्रपटांना १ कोटी रुपये अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ नगरपरिषदेने शहरात उभारलेल्या व्यापारी संकुलातील भाडेकराराची निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत

**(२६) ७२९४२ (१७-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ नगरपरिषदेने शहरात उभारलेल्या व्यापारी संकुलातील १२३५ गाळयाच्या भाडेकराराची मुदत सन २००८-०९ मध्ये संपल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भाडेकराराची मुदत संपून आता १५ वर्षे झाली तरीही मुदतवाढ, फेरलिलाव किंवा निविदा प्रक्रिया

राबवली नसल्याने नगरपरिषदेला जुन्या दरानेच वार्षिक ७४ लाख १० हजार रूपये उत्पन्न मिळते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) भुसावळ नगरपरिषद मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे ९ वर्षाकरिता भाडेकराराने देण्यात आले होते. सदर कराराची मुदत संपली आहे. नगरपरिषदेचे आर्थिक उत्पन्न वाढीकरिता भुसावळ नगरपरिषदेने प्रशासकीय ठराव क्र.६०८, दिनांक २०.११.२०२३ पारीत केला आहे. त्यानुसार व्यापारी संकुलातील गाळ्यांचे अधिमुल्य व भाडे निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरिय समितीकडे पाठविण्यात आला असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

### महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार जाहिर करण्याबाबत

**(२७) ७३०८८ (१३-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी चित्रपटात अभिनय, संगीत, दिग्दर्शन व निर्मिती क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान कलाकारांना कौतुकाची थाप पडून त्यांच्या कार्याची कदर होऊन त्यांचा उत्साह वाढविण्याचे माध्यम असलेले ५७ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार महोत्सव सोहळा सन २०१९ पासून आयोजित करण्यात आला नसल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत ५७ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार महोत्सव सोहळ्याचे आयोजन न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मराठी कलाकारांच्या कलागुणांना न्याय मिळणेकरिता ५७ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार महोत्सव सोहळ्याचे आयोजन करुन नामांकने असलेल्या चित्रपटांना व कलाकारांना पारितोषिके प्राप्त होणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्याबरोबरच केंद्रात देखील उपस्थित झालेली परिस्थिती विचारात घेता सन २०१९ पासून महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार महोत्सव सोहळा आयोजित करण्यात आलेला नाही. मात्र, सन २०१९ - २०२२ या कालावधीतील ५७ वा मराठी चित्रपट महोत्सव सोहळा दिनांक २१.०२.२०२४ रोजी आयोजित करण्यात आला असून, प्रचलित सर्व ४१ पुरस्कार विभागाच्या दिनांक २१.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

### कडेगाव (जि.सांगली) येथील शेतकऱ्यांना कृषी योजनांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ७३२४३ (०८-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि.सांगली) येथील शेतकऱ्यांना शेतीसाठी अवजारे, साहित्य खरेदी व ठिबक सिंचन याकरिता कृषी यांत्रिकीकरण अभियान व राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून शासनाकडून अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना सन २०२१-२२ ते २०२२-२३ या कालावधीतील कृषी योजनांचे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना तातडीने प्रलंबित असलेले कृषी योजनांचे अनुदान प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०६-२०२४) :** (१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरण उप अभियान, राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण व राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून शेतीसाठी अवजारे खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. ठिबक सिंचन यासाठी प्रती थेंब अधिक पिक या योजनेंतर्गत अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.
(२) होय, सन २०२१-२२ ते २०२२-२३ या कालावधीतील कृषि यांत्रिकीकरण योजनांचे अनुदान काही प्रमाणात प्रलंबित होते.
(३) व (४) कृषि यांत्रिकीकरणांतर्गत कडेगाव (जि.सांगली) येथील १५० लाभार्थ्यांपैकी १०८ लाभार्थ्यांना सन २०२२-२३ मध्ये रु.६१,३६,४९९/- इतके अनुदान वितरित केले आहे. उर्वरित निधी उपलब्ध होताच अनुदान वितरीत करण्यात येईल.

---

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा नवीन उपक्रम आखून या योजनेचा लाभ कुशल कामगारांना मिळण्याबाबत

**(२९) ७३९४५ (१३-०२-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकुशल रोजगाराची पुर्तता, दीर्घकालीन टिकण्यासाठी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचाविण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण बेरोजगारीचा वाढता दर पाहता अकुशल कामगारांबरोबरच कुशल कामगारांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून वार्षिक कृषी आराखड्यात तसेच कामगार कल्याण (लेबर वेलफेअर) मध्ये समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर प्रमुख राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेवर प्रतिदिन मिळणाऱ्या वेतनात वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नवीन उपक्रम आखून या योजनेचा लाभ कुशल कामगारांना मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा, २००५ अंतर्गत अंगमेहनतीचे काम करणाऱ्या अकुशल मजुरांना रोजगार देण्यात येतो.
(३) व (४) मजुरी दर केंद्र शासन निर्धारित करीत असते. सन २०२४-२५ करीता प्रतिदिन रू.२९७/- इतका मजुरी दर आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**बीड जिल्ह्यात शासकीय कार्यालयात स्थानिक लोकप्रतिनिधींना आमंत्रित न केल्याबाबत**

**(३०) ७४१५१ (११-०२-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सामाजिक न्याय भवन येथे कृषी विभागामार्फत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून ट्रॅक्टर्स व अन्य शेती अवजारे लाभार्थ्यांना अवजारे वाटपाचा शासकीय कार्यक्रम दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय कार्यक्रमाच्या आयोजनाप्रसंगी स्थानिक, लोकसभा व राज्यसभेचे लोकप्रतिनिधी व अन्य लोकप्रतिनिधी यांना आवर्जुन आमंत्रित करण्याबाबत शासनाने वेळोवेळी अनेकदा परिपत्रके वा आदेश निर्गमित करुन संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचे आदेश अधिकाऱ्यांना बंधनकारक असताना, शेतकऱ्यांशी संबंधित असणाऱ्या या कार्यक्रमास जाणीवपूर्वक लोकप्रतिनधी यांना निमंत्रीत करणे वा कार्यक्रमाबाबत लेखी वा प्रत्यक्ष भेटून पूर्व कल्पना देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अधिक्षक बीड, कृषी अधिकारी, बीड, उपविभागीय कृषी अधिकारी, बीड यांचेसह मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, कृषी आयुक्त, पुणे व जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे पत्रान्वये तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अधिकाऱ्यांच्याविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०६-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. कमी कालावधी मिळाल्यामुळे या कार्यक्रमासाठी निमंत्रण पत्रिका छापलेल्या नव्हत्या. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी दुरध्वनीवरुन लोकप्रतिनिधी यांना कार्यक्रमास हजर रहाण्याबाबत विनंती केली होती.

(४) होय.

(५) व (६) क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्याची जबाबदारी दिलेले उपविभागीय व तालुका कृषि अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

---

**सावंतवाडी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) येथे हत्तीपासून होणाऱ्या नुकसानीबाबत**

**(३१) ७४१८६ (११-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) येथे हत्तीपासून होणाऱ्या नुकसानीबाबत उपवनसंरक्षक कार्यालयात शेतकऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत मा.शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी हत्तीने केलेल्या नुकसान ग्रस्तांसाठी सरसकट १५ ते ३० हजार रुपये नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तसेच हत्तीचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०२४) :**(१) व (२) सावंतवाडी (ता.दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथे वन्यहत्तींपासून होणाऱ्या नुकसानीबाबत श्री.दिपक केसरकर, मा.मंत्री (शालेय शिक्षण व मराठी भाषा), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली उपवनसंरक्षक (प्रादेशिक), सावंतवाडी यांचे कार्यालयात दिनांक ११.०९.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. झाडांच्या वयोमानानुसार परिगणना करुन वन्यहत्तींकडून शेतपिक व फळबागायतींच्या नुकसान भरपाईमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मानव-वन्यहत्ती संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

- कोल्हापूर व सावंतवाडी वन विभागातीन मानव-वन्यहत्ती संघर्ष कमी करण्यासाठी सन २०२३ ते सन २०२६ या तीन वर्षाच्या कालाधीकरीता कृती आराखड्यास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.
- दोडामार्ग तालुक्यातील मौजे आयनोडे, घोडगेवाडी व केंद्रे बुद्रुक या ठिकाणी हत्ती कॅम्प उभारण्यात आले आहेत.
- वन अधिकारी / कर्मचारी, स्थानिक लोकांच्या सहभागाने हत्ती हाकारा गट तयार करण्यात आले असून त्यांच्यामार्फत वन्यहत्तींना मानवी वस्तीपासून त्यांचे नैसर्गिक अधिवासात परतावून लावण्यात येते.
- वन्यहत्ती मानवी वस्तीत येवू नये याकरीता वनक्षेत्रामध्ये जिथे शक्य आहे तेथे हत्ती प्रतिबंधक चर (खंदक) खोदण्यात येते.
- हत्तींच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी Night Mode Drone कॅमेराचा वापर करण्यात येतो.
- वन्यहत्तींना वनक्षेत्रातच खाद्य उपलब्ध व्हावे याकरीता वृक्ष लागवड करण्यात येते.
- गस्तीसाठी वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागात १६ गावे रस्ते, मुलभूत सोई-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(३२) ७४२६२ (०६-०३-२०२४). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील १६ गावे आजही पक्के रस्ते, मुलभूत सोई-सुविधांपासून वंचित असल्याने अनेक अडचणी येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील १६ गावांमध्ये जाण्यास रस्ते नसल्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांना १ ते ५ कि.मी. पायपीट करावी लागत असल्याने आरोग्य कर्मचारी व सेविकांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले यानुषंगाने उक्त दुर्गम भागात रस्ते व मुलभूत सोई-सुविधा, आरोग्य सेवा त्वरित पुरविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये उपलब्ध निधीनुसार रस्ते/पूल यांची कामे राज्यस्तरावरुन मंजूर करण्यात येतात. तसेच जिल्हा वार्षिक घटक कार्यक्रमांतर्गत गावे/पाडे जोडण्यासाठी रस्त्यांना निधी उपलब्ध करुन दिला जातो.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तसेच वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या पायाभूत सुविधांकरीता प्राध्यान्य क्रमाने निधी उपलब्ध करुन देऊन संबंधित यंत्रणेमार्फत कामे करुन घेतली जातात.

आदिवासी उपयोजनेंतर्गत राज्यस्तरावरुन पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यामध्ये लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत मार्च, २०२३ मध्ये रु.२२९५.०० लक्ष किंमतीची ६६ कामे ; जुलै, २०२३ मध्ये रु.१२४०.०० लक्ष किंमतीची ४१ कामे व डिसेंबर, २०२३ मध्ये रु.८८२९.०८ लक्ष किंमतीच्या ४०१ कामांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, प्रलंबित दायित्व, अर्थसंकल्पीय तरतूद व लोकप्रतीनिधींची मागणी विचारात घेऊन आदिवासी उपयोजनेंतर्गत रस्ते व पूलांची कामे मंजूर करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(३३) ७४२९१ (०९-०२-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्रासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आयोगाच्या अधिनियमाचा मसुदा आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेकडून तयार करुन घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२४-०६-२०२४) :** (१) होय, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ मध्ये झालेल्या राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीत, केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यासाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग गठीत करण्याच्या विधेयकाचा मसुदयास सहमती देण्याची राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, नवी दिल्ली यांना दिनांक ७ नोव्हेबर, २०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या वन विभागात सहाय्यक ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या पदांना**
**पाच-सहा वर्षातच पदोन्नती दिली जात असल्याबाबत**

**(३४) ७४३३१ (१३-०२-२०२४). श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वन विभागात सहायक वनसंरक्षकाची २८९ पदे असून त्यापैकी केवळ ८२ पदे सध्या भरण्यात आली असून सुमारे २०० पदे रिक्त असल्याने वन परिक्षेत्र अधिकारी असलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नत करुन सहायक वनसंरक्षक म्हणून नियुक्ती करतात तसेच मागील चार वर्षांत १९३ सहायक वनसंरक्षकांची विभागीय वनाधिकारी म्हणून पदोन्नती झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त झालेल्या पदांवर अद्यापपर्यंत नियुक्तीच झालेली नसून या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांवर देण्यात येऊन मागील तीन वर्षांपासून वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांमधून सहायक वनसंरक्षकांच्या पदोन्नती करणाऱ्या समितीची बैठकच झाली नसल्यामुळे सदर पदे भरण्याच्या दृष्टीकोनातून कोणतीही हालचाल झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रशासकीय कामांवर परिणाम होऊन नये याकरिता पदे रिक्त भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०६-२०२४) :** (१) अंशतः खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०२४ अखेर सहायक वनसंरक्षक संवर्गात मंजूर २८९ पदांपैकी १९९ पदे रिक्त आहेत.

सन २०२३-२४ वर्षाच्या निवडसूचीमधून सहायक वनसंरक्षक संवर्गाची उपरोक्त रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०७.१२.२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली आहे. विभागीय पदोन्नती समितीने प्रस्तावित केलेल्या १७९ अधिकाऱ्यांच्या निवडसूचीस सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त झाली आहे. तथापि पदोन्नतीबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे श्री. निलय भोगे, वनपरीक्षेत्र अधिकारी यांनी रिट याचिका २६४४/२०२४ दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२.०४.२०२४ रोजीच्या आदेशाद्वारे सहायक वनसंरक्षक पदाच्या पदोन्नतीस स्थगिती दिली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सहायक वनसंरक्षकांच्या पदोन्नतीची पुढील कार्यवाही सुरु आहे.

सन २०२२-२३ वर्षाच्या निवडसूचीमधून ७७ सहायक वनसंरक्षकांना विभागीय वन अधिकारी पदावर पदोन्नती दिली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सहायक वनसंरक्षक संवर्गातील रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ वर्षाच्या निवडसूचीमधून १७९ सहायक वनसंरक्षक संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी दिनांक ०७.१२.२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात आली. सदर विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार निवडसूचीतील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील पोकरा योजनेचे अनुदान शासनाकडे थकित असल्याबाबत**

**(३५) ७४४०२ (११-०२-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) अंतर्गत विविध योजना राबविल्या जात असून शासनाच्या योजनेतून शेती पूरक कामे केली जात असल्याचे आतापर्यंत ६१.६५ कोटी रुपयाचे अनुदान शासनाकडे थकीत असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील पाच ते सहा महिन्यापासून अनुदान थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांनी कामे पूर्ण करण्याकरीता विविध पतसंस्थांकडून कर्ज घेऊन कामे पूर्ण केली आहेत त्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचे ओझ वाढत असल्याने शेतकरी संघटनेने शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाद्वारे शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तातडीने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत वैयक्तीक लाभाचे अर्ज, शेतकरी गट/कंपनी यांचे प्रस्ताव तसेच मृद व जलसंधारण कामे यांच्या थकित अनुदानाकरिता दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ अखेर रु.६१.६५ कोटीचा नव्हे तर रु.२६.३३ कोटीचा निधी प्रलंबित होता. प्रकल्पाकडे प्राप्त अर्जांकरिता माहे ऑक्टोबर,२०२३ पासून  वैयक्तीक लाभार्थ्यांकरिता रु.३२.२० कोटी, शेतकरी गट/कंपनीकरिता

रु.१.३९ कोटी व मृद व जलसंधारण कामे यासाठी रु.३.५२ कोटी याप्रमाणे एकूण रु.३७.११ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही. शेतकरी संघटनेचे निवेदन शासनाकडे प्राप्त झालेले नाही.
(३) बुलढाणा जिल्हयातील वैयक्तीक शेतकरी गट/कंपनी तसेच मृद व जलसंधारणाची कामे याकरिता माहे ऑक्टोबर २०२३ पासून एकूण रु.३७.११ कोटी अनुदान अदा केले आहे.
(४) अशी बाब नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत प्रस्तावित कामांना मंजुरी देण्याबाबत**

**(३६) ७४७६४ (१३-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांन्वये मोका तपासणी करुन प्रस्ताव प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडून शासनाकडे मंजुरीस्तव पाठविला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेतील प्रस्तावित कामांच्या यादीतील फक्त मतदार संघातील कामांना मंजुरी देवुन जिल्ह्यातील व इतर तालुक्यातील आदिवासी पाडे, वाडे व गुडे येथे वास्तव करणारे नागरिक विकासापासून वंचित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राजुरा, जिवती, कोरपना व गोंडपिपरी तालुक्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रस्तावित केलेली मोका तपासणी करुन मंजुरीस्तव सादर झालेल्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मोका तपासणी करुन सादर झालेल्या कामांना मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-०४-२०२४) :** (१), (२), (३), व (४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये ठक्कर बाप्पा योजना सुधारित करण्यात आली असून सदर योजना सन २०२२-२३ पासून जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन राबविण्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील १० तालुके तर प्रकल्प कार्यालय, चिमूर अंतर्गत ५ तालुके कार्यरत आहेत. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ३०/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील ८ तालुक्यातील रू.२० कोटी ३१ लक्ष ७५ हजार रकमेचा प्रस्ताव राज्यस्तरावरून मंजुरीस्तव शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंर्गत सन २०२३-२४ मध्ये दिनांक ०६/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभूर्णा व मूल या ४ तालुक्यांमधील रू.११६५.२५ लक्षच्या १२६ कामांना राज्यस्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०२२-२३ या वर्षाकरीता चंद्रपूर प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे दिनांक ३०/३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये चंद्रपुर प्रकल्पांतर्गत १० तालुक्यांमधील रू.१,१५,९२,०००/- इतक्या रकमेच्या ३० कामास व चिमुर प्रकल्पांतर्गत ५ तालुक्यांमधील रू.७८,६१,०००/- रकमेच्या २५ कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच ठक्कर बाप्पा ही वस्तीसुधार योजना ही नियमित योजना असून सदर योजनेंतर्गत कामांची मागणी उपलब्ध निधीपेक्षा मोठया प्रमाणावर असल्याने दरवर्षी उपलब्ध होणारा निधी विचारात घेवून आदिवासी वस्ती/गावांतर्गतची विकास कामांना राज्यस्तर व जिल्हास्तरावरुन मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी महाविद्यालय अंबाजोगाई (जि.बीड) येथील कर्मचाऱ्यांना निवासस्थाने व विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाबाबत

**(३७) ७४७७८ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी महाविद्यालय अंबाजोगाई (जि.बीड) येथील कर्मचाऱ्यांना निवासस्थाने व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतीगृहाच्या इमारतीला मागील १० ते १५ वर्षापासून दुरुस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुरुस्ती अभावी वास्तू मोडकळीस आल्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांना शहरात भाड्याने घरे घेऊन राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालयात दरवर्षी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो तसेच इतर शासकीय व निमशासकीय कृषी महाविद्यालयांच्या जवळपास ३०० ते ४०० विद्यार्थ्यांची याठिकाणी परीक्षा होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे महाविद्यालयातील कर्मचारी निवासस्थाने व वसतीगृहाच्या इमारती दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई या महाविद्यालयाची स्थापना सन २००० मध्ये झाली आहे. सुरुवातीच्या काळात या महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता कमी असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशक्षमतेनुसार वसतीगृह तयार करण्यात आले होते. आता महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ झाली असल्याने, कृषी महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड येथील विद्यार्थी वसतिगृह इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामाच्या रु.५४८.०३ लाख रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) कृषि महाविद्यालय, अंबेजोगाई, जि.बीड येथील विद्यार्थी वसतीगृहाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामास देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार टप्प्याटप्प्याने निधी वितरीत करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या 'ब' वर्गातील जमिनी 'अ' वर्गात वर्ग करण्याबाबत

**(३८) ७४९८३ (१०-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये हजारो गृहनिर्माण संस्था या शासकीय जमिनीवर उभ्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'ब' वर्गातील जमिनी 'अ' वर्गात वर्ग करण्याकरिता १५% ऐवजी ५% दर आकारणी करण्यात यावी अशी मागणी विविध सहकारी संस्था तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका महिन्यात हा दर ५% करण्यात येईल असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०६-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) निवासी/रहिवाशी प्रयोजनार्थ शासनामार्फत प्रदान केलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करताना सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत अधिमूल्याची रक्कम कमी करण्याबाबतची अधिसूचना दिनांक १६.०३.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा व अकोला जिल्ह्यात गुलाबी बोंड अळी, रस शोषक कीड व बोंडसड यामुळे कपाशीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३९) ७५४०८ (११-०२-२०२४). श्री.राजेश एकडे (मलकापूर), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा व अकोला जिल्ह्यांमध्ये गुलाबी बोंड अळी, रस शोषक कीड व बोंडसड यामुळे कपाशीचे नुकसान होऊन उत्पादनावर परिणाम होऊन उत्पादनात घट झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांचा सर्वे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांसाठी प्रथमोपचार पेट्यांमध्ये मुदतबाह्य औषधांचा पुरवठा करण्यात आल्याबाबत

**(४०) ७६१३२ (०९-०२-२०२४). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील कळवण प्रकल्प कार्यालयाकडून परिसरातील ३९ शासकीय आश्रमशाळा आणि २३ वसतीगृहांसाठी देण्यात आलेल्या प्रथमोपचार पेट्यांमध्ये मुदतबाह्य औषधांचा पुरवठा करण्यात आल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील कळवण प्रकल्प कार्यालयाकडून ३९ शासकीय आश्रमशाळा आणि २९ वसतीगृहांसाठी पुरवठा करण्यात आलेली औषधे ही मुदतबाह्य नसल्याची पडताळणी करुनच संबंधीत आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व वसतीगृहांचे गृहपाल यांनी मालाची पोहोच पावती प्रकल्प अधिकारी, कळवण या कार्यालयास सादर केलेली आहे.

शासकीय आश्रमशाळा व वसतीगृह स्तरावरुन औषधे पुरवठाबाबत कुठलीही लेखी तक्रार प्रकल्प अधिकारी, कळवण या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील पोकरा प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यात उर्वरित सर्व गावांची निवड करण्याबाबत**

**(४१) ७६५१९ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात ३९१ गावांची निवड करण्यात आली असूनही अद्याप दुसऱ्या टप्प्यातील गावांची निवड करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी आयुक्तालय, पुणे यांनी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा हा अवर्षण, आत्महत्या ग्रस्त व मागास जिल्हा असल्यामुळे नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पात दुसऱ्या टप्प्यात बीड जिल्ह्यातील उर्वरित सर्वच गावांची निवड करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई यांच्याकडे दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२६-०६-२०२४) :** (१) व (२) होय,

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात बीड जिल्ह्यातील ३९१ गावांची निवड करण्यात आली होती. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या आखणीचे काम आणि गाव निवडीचे शास्त्रशुध्द पध्दतीने निकष ठरवून त्या आधारे टप्पा-२ करीता गावांची निवड करण्यासाठी अपर मुख्य सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या गाव निवड समितीमार्फत गाव निवडीबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ साठी गाव निवडीची प्रक्रिया सुरु आहे.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यात अनेक ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(४२) ७६६६० (१९-०३-२०२४). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात अनेक ग्रामपंचायतींमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत जिल्ह्यातील १० पेक्षा अधिक ग्रामविकास अधिकारी यांच्यावर दोषारोपपत्र दाखल झाले असताना जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी यांनी ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विभागीय कोकण आयुक्त यांच्या चौकशी समितीने याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे कारवाईसाठी पाठविलेला असताना मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदूर्ग व अन्य अधिकारी यांच्याकडून सदरहू आदेशाचे पालन झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विभागीय कोकण आयुक्त यांनी दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे दिलेल्या निर्देशानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विभागीय कोकण आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार केलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे, तसचे विभागीय कोकण आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन न करणाऱ्या वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१९-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील मनरेगाअतंर्गत धुपप्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामात झालेल्या गैरव्यवहारा संदर्भात प्राप्त झालेल्या दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आालेल्या चौकशीत सबंधित ग्रामपंचायतीमधील सदर कामात अनियमितता झाल्याचे तथ्य आढळून आले.
(२) हे खरे नाही.
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) जि.प.सिंधुदूर्ग यांच्या दिनांक १६/०१/२०२० च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी दोषारोपाच्या अनुषंगाने शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेले तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी हे सदर ग्रामपंचायतीत ग्रामसेवक पदावर कार्यरत होते (ग्रामविकास अधिकारी हे पद ग्रामसेवक संवर्गातून पदोन्नतीचे पद आहे) व सदरचे प्रकरण सहायक आयुक्त चौकशी (परिषद सेवक) कोकण भवन, नवी मुबंई यांचेकडे विभागीय चौकशीसाठी सादर करण्यात आले होते.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी सहायक आयुक्त चौकशी (परिषद सेवक) कोकण भवन नवी मुबंई यांचेकडून प्राप्त झालेल्या विभागीय चौकशीच्या अहवालातील अभिप्रायाच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या तत्कालीन ग्रामसेवकांना शास्तीपुर्व नोटीसा देवून व त्यांची अभिवेदने घेवून त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार दिनांक २४/०१/२०२४ च्या आदेशान्वये अंतिम शास्तीची कारवाई करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मॅटचे नागपूर विभागीय खंडपीठात न्यायमूर्तीचे पद रिक्त असल्याबाबत**

**(४३) ७६७८५ (२१-०२-२०२४). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च न्यायालयावरील भार कमी व्हावा तसेच प्रशासकीय बाबीचे वाद लवकर सुटावे या उद्देशाने शासनाने मॅट (महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण) स्थापन करुन मुंबईतील मुख्य पिठासोबत औरंगाबाद व नागपूर येथे मॅटची खंडपीठे स्थापन करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर खंडपीठाचे तत्कालीन उपाध्यक्ष व मा.न्यायमुर्ती निवृत्त झाल्याने नागपूर खंडपीठातील विभागीय खंडपीठाचे कामकाज नियमित प्रकरणासाठी बंद करण्यात आल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त जागेवर नवीन न्यायमूर्तीची अद्याप नियुक्त न झाल्यामुळे याचिकाकर्त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे व सुनावन्या होत नसल्याने, त्यांना न्याय मिळण्यात विलंब होत असून २ हजाराहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याच्या तक्रारी याचिकाकर्त्यांनी प्रशासनाकडे वारंवार करुनही अद्याप कार्यवाही केली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ चे तत्कालीन मा.सदस्य (प्रशासकीय) तथा उपाध्यक्ष दिनांक १७.०४.२०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर सदरचे पद अद्याप रिक्त आहे. तथापि, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ येथील मा.सदस्य तथा उपाध्यक्ष (न्यायिक) व मा.सदस्य (न्यायिक) ही दोन्ही पदे भरलेली असून या पदांवर कार्यरत मा. सदस्यांमार्फत नागपूर खंडपीठाचे कामकाज नियमित प्रकरणांसाठी पार पाडण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई किंवा औरंगाबाद खंडपीठाचे सदस्य (प्रशासकीय) हे नागपूर येथे खंडपीठाच्या बैठकीसाठी आल्यानंतर त्यांच्यामार्फत डिव्हीजन बेंचची प्रकरणे सुनावणीसाठी घेण्यात येतात.
(३) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठामध्ये माहे फेब्रुवारी, २०२४ अखेरपर्यंत सिंगल बेंच व डिव्हीजन बेंचची एकूण ४०६० प्रकरणे प्रलंबित आहेत.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठातील सदस्य (प्रशासकीय) हे रिक्त पद भरण्यासाठी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये दिलेल्या जाहिरातीनुसार निवडप्रक्रीया करुन निवडलेल्या सदस्य (प्रशासकीय) यांनी पदाचा कार्यभार न स्विकारल्याने सदर रिक्त पद भरण्यासाठी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये नव्याने जाहिरात देवून निवडप्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. या अनुषंगाने गठीत केलेल्या शोध-नि-निवड (search) समितीने केलेल्या शिफारशीनुसार उमेदवारांच्या नावांचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे पाठविण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या निवासी आश्रमशाळेपैकी २५० आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याबाबत

**(४४) ७६९४० (१३-०२-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून आश्रमशाळेच्या विकासात्मकासाठी रासायनिक तंत्रज्ञान संस्था, विज्ञान प्रयोगशाळा, संगीत व कला विभाग, पुरेसे शौचालय अशा सुसज्जा भौतिक सोई-सुविधा करुन विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास करण्याच्या दृष्टीने २५० आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा विकसित करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या २५० आश्रमशाळेची जिल्ह्यानुसार आकडेवारी व विकास कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, आदिवासी बहुल वा पेसा कायदा लागू असलेल्या जिल्ह्यामध्ये तेथील शासकीय आश्रमशाळांना प्राधान्याने समाविष्ट करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच शैक्षणिक शुल्कामध्ये डिजीटल वर्ग, आभासी वर्ग आणि संगणक प्रयोगशाळा यांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
शासनाने घोषित केलेल्या २५० आदर्श आश्रमशाळांपैकी प्रथम टप्प्यात १२१ आदर्श आश्रमशाळेसाठी ई-निविदेची कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

(३) हे खरे आहे.
आदिवासी बहुल वा पेसा कायदा लागू असलेल्या जिल्ह्यातील एकूण २३३ शासकीय आश्रमशाळांचा समावेश आहे.
(४) शासनाने घोषित केलेल्या २५० आदर्श आश्रमशाळांपैकी प्रथम टप्प्यात १२१ आदर्श आश्रमशाळा विकसित करण्यात येत असून त्यामध्ये डिजिटल क्लासरुम, व्हर्चुअल क्लासरुम, टॅब लॅब, फेसियल बायोमॅट्रिक इत्यादी अत्याधुनिक डिजीटल शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यास्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथे रेशीम महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबत**

**(४५) ७७०३० (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील कृषी महाविद्यालयात रेशीम महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबत "उचित कार्यावाहीस्तव" प्रस्ताव संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास कुलसचिव, वनाकृमावि, परभणी यांच्याकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात त्वरित कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कुलसचिव, वनाकृमावि, परभणी यांच्याकडे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत अंबेजोगाई, जि.बीड येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करणेबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनास शिफारस केलेली नाही. यासंदर्भात कृषि परिषदेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथे अन्नतंत्र व प्रक्रिया महाविद्यालयाचा प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर करण्याबाबत**

**(४६) ७७०३१ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे अन्नतंत्र व प्रक्रिया महाविद्यालयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास कुलसचिव, वनाकृमावि, परभणी यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव त्वरित तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कुलसचिव, वनाकृमावि, परभणी यांच्याकडे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१८-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत अंबेजोगाई, जि.बीड येथे अन्नतंत्र व प्रक्रिया महाविद्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेची मान्यता प्राप्त झालेली नाही. तसेच, महाराष्ट्र कृषि परिषदेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ८५ तलाठयांना अस्थायी पदावरुन कायम करण्याबाबत**

**(४७) ७७१७९ (०९-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ८५ तलाठयांना अस्थायी पदावर चार महिन्यांची मुदत वाढ दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तलाठ्यांना मुदतवाढ देऊन महसूल विभागातील प्रशासकीय कामकाज कसे गतिमान होणार तसेच उक्त तलाठयांना कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोंबर, २०२३ नुसार राज्यातील तलाठी संवर्गातील अस्थायी पदांना दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(२) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत तलाठी संवर्ग एकुण-मंजूर पदे आहेत त्यापैकी एकुण - कार्यरत आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ मधील तरतुदीनुसार कार्यरत २६९ पदांपैकी १९० तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना स्थायी कर्मचारी म्हणून आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उर्वरीत ७९ कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ मधील तरतूदींनुसार परीक्षा तसेच तीन वर्षाची शासकीय सेवा पुर्ण न केल्यामुळे स्थायी करण्यात आले नाही. शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील तलाठी संवर्गातील अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२४ ते दिनांक ३१.०८.२०२४ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २१ जून, २००६ नुसार ज्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा पूर्ण केला आहे व आढाव्याअंती निश्चित केलेल्या आकृतीबंधास मुख्य सचिव समितीची मान्यता घेवून त्यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित केला आहे, अशा प्रशासकीय विभागांना त्यांच्या अधिपत्याखालील एकुण पदांच्या ८०% पदे कायम करण्यास काही अटींच्या अधिन राहून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. अद्याप महसूल व वन विभागाचा पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून त्याव्दारे सदरहू अस्थायी पदे स्थायी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माथेरान गिरीस्थान (जि.रायगड) नगरपरिषदेच्या मालकीच्या गाळ्यांचे लिलाव प्रक्रिया न राबवता नियमबाह्य विक्री हस्तांतरण केल्याबाबत**

**(४८) ७७२७२ (१७-०२-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान गिरीस्थान (जि. रायगड) नगरपरिषदेच्या मालकीच्या असलेल्या कपाडिया मार्केटमधील स्टॉल (गाळे) हे माथेरानचे स्थानिक भूमिपुत्र असलेल्या गरजू व बेरोजगारांना व्यवसायाकरिता लिलाव पद्धतीने भाडेतत्वावर शासन पारित अटी-शर्तींनुसार देण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्केटमधील गाळे क्र. एस.टी.एल ०००॰१६, ००००९७ व ००००८८ या तीन गाळयांचे हस्तांतरण हे माहे डिसेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ यादरम्यान शासन पारित अटी-शर्तींचे उल्लंघन करून, कोणतीही लिलाव प्रक्रिया न राबवता नियमबाह्य झाल्याचे पत्रकार श्री.आनंद बाबुराव सकपाळ, रा.नेरळ, ता.कर्जत यांना नगरपरिषद, माथेरान गिरिस्थान यांचेकडून माहे मार्च-एप्रिल, २०२३ मध्ये दिले असल्याचे माहितीच्या अधिकारातून प्राप्त केलेल्या माहितीद्वारे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण गैरप्रकाराबाबत श्री.आनंद सकपाळ दिनांक ४ मे, २०२३ रोजी जिल्हाधिकारी, रायगड तसेच आयुक्त, कोकण आणि आयुक्त व संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडे रीतसर तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०६-२०२४) :** (१) व (२) माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या हद्दीतील कपाडीया मार्केट हे नगरपरिषदेला दान स्वरुपात प्राप्त झाले असून ते १०० वर्षे जुने आहे. सदर मार्केट मधील गाळे/ स्टॉल हे स्थानिक नागरीकांना व्यवसाय / धंदा करण्यासाठी भाडेपट्टयाने/ भोगवटादार म्हणून देण्यात आलेले आहेत. माथेरानची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता या ठिकाणी लिलाव करणे शक्य नसल्यामुळे त्या ठिकाणी आजपर्यंत लिलाव झालेला नाही. तथापि, ही कुंठीत अवस्था घालवण्यासाठी कपाडिया मार्केट मधील ३ गाळयांची हस्तांतरण फी घेऊन भाडेपट्टा हस्तांतरण करणेबाबत अर्जदाराने केलेल्या मागणीनुसार कागदपत्रांची पडताळणी करुन व नियमानुसार फी आकारुन नगरपरिषदेने लादलेल्या अटी-शर्तीच्या अधीन राहून भोगवटादाराचे नांव फक्त भाडेपट्टाधारक म्हणून नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच नगरपरिषदेचे आर्थिक हित लक्षात घेता हस्तांतरण फी जमा करुन नोंदणी करण्यात आली आहे. सदर गाळयांचे दर तीन वर्षानी नुतनीकरण करणे आवश्यक असून मूळ मालकी नगरपरिषदेची असणार आहे.
(३) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली आहे.
(४) माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने केलेल्या ठरावानुसार कपाडिया मार्केट येथील गाळे/ स्टॉल चे भाडेपट्टा हस्तांतरण केले असून वाढीव हस्तांतरण शुल्कामुळे नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. ही वस्तूस्थिती असली तरी नगरपरिषदेच्या मालमत्तेचे हस्तांतरण करतांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देशानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी यापुढे नगरपरिषदेच्या मालमत्तेचे हस्तांतरण करतांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याच्या सूचना संबंधितांना देण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोनवळा ( ता.अंबाजोगाई) येथील तलावासाठी संपादित जमिनीचा मावेजा वाटप करण्याबाबत

**(४९) ७८८१६ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनवळा (ता.अंबाजोगाई) येथील श्री.सुभाष शेषराव पतंगे व इतर २६ नागरीकांची शासनाने सोनवळा साठवण तलावासाठी जमीन संपादित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकरी यांचे प्रकरण कलम २८ अ प्रमाणे विशेष भूसंपादन कार्यालय, अंबाजोगाई येथे दाखल असून सदर प्रकरणाचा पुरावा आहे. परंतु, अद्याप त्यांना मावेजा वाटप करण्यात आलेला नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त २७ नागरीकांना त्वरित मावेजा वाटप करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे

काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने किती लोकांना मावेजा वाटप केला आहे, त्यासाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) श्री.सुभाष शेषराव पतंगे व इतर २६ नागरीकांची सोनवळा साठवण तलावासाठी सोनवळा (ता. अंबाजोगाई) येथील जमीन संपादित केली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उक्त २७ नागरीकांना त्वरित मावेजा वाटप करण्याबाबतची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचेकडील Civil Appeal मधील दिनांक ०३.०२.२०२२ व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई यांचे कडील Writ Petition मधील दिनांक २४.०६.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार लोकअदालतीमध्ये झालेल्या तडजोडीनुसार दिलेल्या आदेशाच्या आधारे भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम २८ अ नुसार दावा दाखल करता येणार नाही असे मा.उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेल्या निर्णयामध्ये स्पष्ट केले आहे.

उक्त निर्णयाच्या आधारे उपजिल्हाधिकारी, बीड मु.अंबाजोगाई यांचे दिनांक १८.०१.२०२३ च्या पत्रान्वये श्री. सुभाष शेषराव पतंगे व इतर खातेदार साठवण तलाव सोनवळा यांचे २८-अ चे दावे निकाली काढण्यात आले असून, संबधित खातेदारांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.मातार्डी (ता.जि.ठाणे) येथील जागा बुलेट ट्रेनसाठी शासनाने संपादीत केल्याबाबत

**(५०) ७९३६१ (०६-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.मातार्डी (ता.जि.ठाणे) येथील श्री. जिवन महादु पाटील, यांची २३ गुंठे जागेमधील २.०३ गुंठे एवढी जागा बुलेट ट्रेनसाठी शासनाने संपादीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू २.०३ गुंठे जागेवर मे.हनी इटर या कंपनीने खोटी कागदपत्रे दाखवून दावा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दावा उप विभागीय अधिकारी S.D.O. यांनी सुनावणीच्या माध्यमातून खोटा ठरविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.जिवन महादू पाटील यांची शासनाने संपादीत केलेल्या जागेचा मोबदला देण्यात आला आहे काय, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०६-२०२४) :** (१) व (२) मौजे मातार्डी, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे नं.५२/३ एकुण क्षेत्र ०-२३-०० हे.आर.चौ.मी. पैकी ०.०२-०३ हे.आर.चौ.मी. क्षेत्र बुलेट ट्रेन साठी संपादित केली आहे.

मे. हनीइटर्स प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. यांनी नोटरीकृत दस्त दिनांक ३०/०३/२०११ आधारे हरकत अर्ज दाखल केला, हे खरे आहे.
(३) व (४) मे. हनीइटर्स प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. यांनी केलेल्या हरकत अर्जाचे अनुषंगाने संबधितांची सुनावणी घेऊन दिनांक ३१/१०/२०२३ रोजी प्रकरण निर्णित केले.

संपादित जमिनीच्या नुकसानभरपाईची रक्कम श्री.जिवन महादु पाटील यांना अदा करणेस हरकत असल्यामुळे नुकसानभरपाईची रक्कम भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ७७ अनुसार मा. निबंधक, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडे जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.